**सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील**
**दि.०१.०१.२००५ ते दि. ३१.१२.२०१५ या**
**कालावधीतील तात्पुरती सामाईक सेवाज्येष्ठतासुची**

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत ,३/४ था मजला, ,**
**शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१**

**परिपत्रक क्र.** १७८/सेवाज्ये २००५-२०१५/का ८(१)/सहाप्रापअ/२०१६/जाक्र १९८९० दिनांक 9 DEC 2016

संदर्भ : शासन गृह विभाग परिपत्रक क्र. याचिका-०६१४/प्र.क्र.१९६/परि-४, दिनांक ०१.१२.२०१६

## प रि प त्र क

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र. २६४/२०१० व ४०९/२०१० यामध्ये दि. ७.११.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार मोटार वाहन विभागातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील दि. ०१.०१.२००५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीतील प्रत्येक वर्षाची दि. १ जानेवारी रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती (प्रारुप) सेवाज्येष्ठता यादी शासनातर्फे प्रसिध्द करण्यात आली आहे. शासनाचे परिपत्रक व ज्येष्ठतासुच्या सर्व संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आणणेबाबत शासनाचे निर्देश मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राप्त झाले आहेत. त्यानुसार या परिपत्रकाद्वारे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाची दि. ०१.०१.२००५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर सेवाज्येष्ठता यादीची प्रत मोटार वाहन विभागाचे www.mahatranscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, सदर सेवाज्येष्ठता यादीची प्रत संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावी व त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देऊन त्याची पोच घ्यावी. सध्या पदोन्नतीने वरिष्ठ पदांवर (या सुचीमध्ये ज्यांची नावे अंतर्भूत आहेत असे) कार्यरत असलेल्या अधिका-यांनाही सदर यादीची प्रत देऊन त्याबाबतची पोच घेण्यात यावी. तसेच उपरोक्त यादीमधील आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असणा-या सेवानिवृत्त अधिका-यांना /कार्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांनाही सदर यादीची प्रत देऊन त्याबाबतची पोच घेण्यात यावी.

सर्व संबंधित अधिका-यांना एतद्वारे सुचित करण्यात येते की दि. ०१.०१.२००५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीच्या तात्पुरत्या सेवाज्येष्ठता यादी संदर्भात ज्यांची निवेदने, हरकती, आक्षेप असल्यास त्यांनी त्यांची अशी निवेदने हया तात्पुरती सेवाज्येष्ठता याद्या प्राप्त झालेल्या दिनांकापासून २ आठवडयांच्या आत मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत सादर करावीत.

सहपत्र : सेवाज्येष्ठता याद्या

**(अ. ना.भालचंद्र),**
**परिवहन उप आयुक्त (व.श्रे)**
**(प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रति,**

१. संबंधित सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (नियंत्रक अधिका-यांमार्फत)
२. सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई

D:\com - 5\PRITI\order.docx\188